मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील राजशिष्टाचार विभागाकरिता एक नवीन वाहन खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएआर २०११/११४८/प्र.क्र. २१८/का.चार

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
तारीख: १५ डिसेंबर २०१७.

संदर्भ -

१) प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. P/SC/२०१७/१३६४, दि. १३/११/२०१७.

२) शासन निर्णय, समक्रमांक, दि. १९/०४/२०१७, दि. २३/०६/२०१७ व शुद्धिपत्रक, दि. १/०८/२०१७.

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वाहन २०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि. २१/०१/२०१७.

प्रस्तावना -

मा. सर्वोच्च न्यायालय तसेच इतर उच्च न्यायालयातील मा. न्यायमुर्तींच्या मुंबई येथील दौऱ्यामध्ये या उच्चपदस्थांकडील साहित्य मोठ्या प्रमाणात असताना उच्च न्यायालयाच्या राजशिष्टाचार विभागाकडील वाहनांमध्ये हे साहित्य बसविणे अनेकदा अवघड होऊन संबंधित अधिकाऱ्यांना विशिष्ट परिस्थितींना तोंड द्यावे लागते. अशा विशिष्ट परिस्थितींना तोंड देण्याकरिता उच्च न्यायालयाच्या राजशिष्टाचार विभागासाठी ४ टोयोटा इनोवा (Toyota Innova) प्रकारातील वाहने उपलब्ध करण्याचा उच्च न्यायालयाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यापैकी दोन टोयोटा इनोवा प्रकारातील वाहने खरेदी करण्यास तसेच त्यासाठीचा निधी संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध करण्यास संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय, दि. १९/०४/२०१७, दि. २३/०६/२०१७ व शुद्धिपत्रक, दि. १/०८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

उर्वरित दोन टोयोटा इनोवा प्रकारातील वाहने खरेदीच्या अनुषंगाने निधीच्या उपलब्धतेबाबत उच्च न्यायालयाने सादर केलेल्या अभिप्रायानुसार त्यास प्रशासकीय मान्यता देणे व त्याकरिताचा निधी संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय -

मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या वापरासाठी राजशिष्टाचार विभागाकरिता टोयोटा इनोवा (Toyota Innova) प्रकारातील ०१ वाहन वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. २१/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या शासकीय वाहनांच्या किंमत मर्यादा धोरणानुसार खरेदी करण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या खर्चास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर

वाहनांच्या खरेदीसाठी आवश्यक निधी संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध करण्यास या आदेशाद्वारे खालील अटींच्या अधीन राहून एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

१) शासन परिपत्रक क्र. मविनि-१०१६/प्र.क्र.६/१६/विनियम, दि. ०४/०३/२०१६ मधील सूचनेनुसार (२०१४ ००६५) या लेखाशीर्षाखाली दि. ३१/०३/२०१७ यापूर्वीचे तपशीलवार देयक प्रलंबित नाही.

२) दि. ३१/०३/२०१७ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशीलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

३) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४) खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहीत मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

६) मासिक निधी विवरणपत्रानुसार या करीता निधी उपलब्ध आहे.

२. वाहन खरेदी करताना त्या त्या क्षेत्रात सदर वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीची सुविधा तसेच वाहनांच्या सुटया भागांची उपलब्धता समाधानकारक असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावांतंर्गत वाहनाची खरेदी शासनमान्य विहीत कार्यपध्दतीने करण्यात यावी.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४ (न्यायदान) (भारित) - १०२ - उच्च न्यायालय, (०२) (०१) प्रबंधक, मूळ शाखा (२०१४ ००७४) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखालील सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचे अनौ. संदर्भ क्र.३२८/विनियम, दि. ४/०७/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या सहमतीने तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१५१५३३११६५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjeev Rajaram Keluskar

Digitally signed by Sanjeev Rajaram Keluskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Low And Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a521517a0d3fba83ff4473cb0d448a75f9b7f83cba41836833b60c93758c804, cn=Sanjeev Rajaram Keluskar
Date: 2017.12.15 15:36:12 +05'30'

(संजीव केळुसकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.

२. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

३. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),महाराष्ट्र-एक, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग, व्यय ५/विनियम शाखा मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, का. २३/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती.